Vol 3 Issue 5 Nov 2013

Impact Factor : 1.9508 (UIF)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1.9508 (UIF)**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-5, Nov-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# स्त्रीमुक्ती चळवळ आणि स्त्रीवादी साहित्य

माधव बसवंते
संशोधक मार्गदर्शक

**सारांश:** मानवजातीच्या इतिहासाइतकाच भारतातील स्त्री जातीवरील अन्याय व अत्याचार सनातन असून पुरूषप्रधान समाजाने स्त्रिला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य दिलेले नाहीत्र  याउलट मातृसत्ताक समाज अवस्थेत स्त्रियांचे स्थान हे पुरूषांपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे होते.  मुलीचा जन्म अशुभ मानून तिची जन्मापूर्वीच हत्या केली जात आहे.  एकंदरीत जगाच्या पाठीवर स्त्रियांचे जीवन उपेक्षितच राहिलेले आहे.  भारतातील आदिवासी, मुस्लीम, दलित आणि भटक्या जमातीतील स्त्रियांचे दुःख तर अतिशय भयावह आहे. इ.स. 19 व्या शतकात स्त्री—पुरूष समानतेचा विचार अनेक समाजसुधारकांनी समाजात निष्ठेने पेरण्याचा प्रयत्न केला आहे. बाळशास्त्री जांभेकर दर्पणच्या माध्यमातून तर गोपाळहरी देशमुख यांनी शतपत्रांमधून स्त्रियावरील अत्याचा—याच्या विरोधात व्यापक प्रमाणात स्त्रीशिक्षणाची सामाजिक जागृती केली.  स्त्री—पुरूषांना समान संधी व समान स्वातंन्न्याची मागणी आगरकरांनी केली होती.

### प्रस्तावना:

महात्मा ज्योतीराव फुले यांनी स्त्रियांच्या आत्मसन्माला जागृत करून स्त्री साहित्याला प्रेरणा दिली. म. फुलेंच्या शाळेत शिकणारी साधारणतः अकरा वर्षांची विद्यार्थिनी मुक्ता हिने तत्कालीन परिस्थितीवर आणि धार्मिक व्यवस्थेवर आपल्या निबंधातून प्रहार केला आहे. मुक्ताचा हा निबंध म्हणजे देशातील स्त्रीमुक्तीचा पहिला उद्‌गार होता.  म. फुलेंचे हे कार्य स्त्रीवादी साहित्याची प्रमुख प्रेरणा म्हणावी लागते.  समाजसुधारक स्त्रियांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करीत होते, तर दुसरीकडे याच काळात स्त्रियांनी आपल्या समस्यांवर लेखन करीत होते. साधारणतः विसाव्या शतकाच्या सुरूवातीला स्त्रियांनी लेखनाला प्रारंभ केल्याचे दिसून येते. इंग्रजी राजवटीमुळे झालेली आधुनिक जाणीव, शिक्षण व नव्या विचारांनी आत्मसन्मान प्राप्त झाल्यामुळे स्त्रीवादी लेखनाला चालना मिळाली. स्त्रीवादी लेखन हे इ. स. 1885 ते 1950 या दशकात झाले असले, तरी या स्त्रीवादाची तात्विक बैठक मात्र इ. स. 1970 च्या दशकात मराठी वाड्.मयात स्वीकारण्यात आली.

### स्त्रीमुक्ती चळवळीचे स्वरूप :

भारतातील जातीव्यवस्था जितकी कठोर आहे, तितकीच स्त्री दाहकता कठोर आहे. केवळ कनिष्ठ वर्गातील स्त्रियांवरच अन्याय व अत्याचार होतात असे नाही, तर भारतात श्रेष्ठ वर्गात जीवन जगणा—या स्त्रियांनाही दुय्यमतेची वागणूक दिली जाते. भारतीय स्वातंन्न्यानंतर एक माणूस एक मूल्य हा विचार सर्वत्रफैलावला असला, तरी भारतातील सामाजिक परिस्थिती मात्र भिन्न व विषम स्वरूपाची आहे. जात पंचायतीचे निवाडे करणारे प्रमुख हे पुरूष असल्यामुळेच स्त्रीविषयक निवाडयातून स्त्रियांना अधिक कडक शिक्षा दिली जाते. स्त्री—पुरूषांतील असामनतेमुळे समाजात वेदना आणि विद्रोहाने पेट घेतला आहे.  या स्त्रीमुक्तीच्या चळवळीतून मराठी वाड्.मयात एक स्वतंत्र स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह निर्माण झाला आहे.

प्रामुख्याने इंग्रजी राजवटीतच समाजसुधारणांची चळवळ अधिक गतीमान झाली.  पाश्चात्य विचारांच्या प्रभावातून भारतात समतावादी विचारांना गती प्राप्त झाली.  राजा राममोहन रॉय हे स्त्री सुधारणाचे आद्यप्रवर्तक मानले जातात.  स्त्रियांवरील अन्याय, सतीची चाल, विधवा पुनर्विवाह, पुरूष अहंकर, स्त्रियांमधील शिक्षणाचा अभाव यामुळे स्त्रियांच्या जीवनात अनेक चळवळीमध्ये स्त्रियांना सहभागी केले.  धोंडो केशव कर्वे यांचे स्त्रीसुधारणांचे कार्य महत्वाचे आहे.  पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना समान अधिकारांना पुरस्कार आणि दलित स्त्रियांना आत्मसन्मानाची जाणीव प्राप्त करून दिली.  एकंदरीत परमहंस सभा, प्रार्थन समाज, आर्य समाज, बाम्हो समाज यासारख्या अनेक संस्थांच्या माध्यमातून स्त्रीमुक्तीची चळवळ अधिक गतीमान झाली होती.

भारतीय स्वातंन्न्योत्तर कालखंडात अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या. या अनेक चळवळी अधिक आक्रमक झाल्या आहेत.विशेषतः दलितांनी जाती अंताच्या लढयासाठी आक्रमक आणि विद्रोही पवित्राा घेतला आहे. इ. स. 1975 ते 1985 या आंतरराष्ट्रीय महिला दशकात स्त्रियांच्या हक्क आणि अधिकाराविषयी जागृतीनिर्माण करण्यांत येऊन प्रामुख्याने याच काळात स्त्रीमुक्ती चळवळीचा पाया रोवला गेला.स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे स्त्रियांनी केवळ स्त्रियांसाठी चालवलेली चळवळ नव्हे, तर स्त्रीमुक्ती चळवळ ही मानवमुक्तीच्या चळवळीतील एक प्रवाह आहे.  समाजात स्त्रियांना कमी दर्जाची आणि असमान स्वरूपाची वागणूक मिळते,  त्यातून मुक्तता म्हणजे स्त्रीमुक्ती होय.  समाजातील स्त्रीला एक व्यक्ती म्हणून पुरूषांच्या बरोबरीने आणि समान स्वरूपात वागणूक दिली पाहिजे ही विचारधारा स्त्रीमुक्ती चळवळीत मांडली जाते.  या स्त्रीमुक्तीच्या चळवळीतील काही महत्वाच्या ठळक घटना म्हणून स्त्रीविषयक खटल्यांसाठी स्वतंत्रपणे स्त्री न्यायाधीश, मुस्लीम स्त्रियांसाठी समान नागरी कायदा, स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी महिला हक्क संरक्षण कायदा, बलात्कारविरोधी कडक कायदा, स्त्री देहप्रदर्शन व विक्रीला विरोध, स्वतंत्र राखीव जागा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, नोकरीच्या ठिकाणी शोषणमुक्ती संरक्षण यासारख्या अनेक स्त्रीविषयक कायद्याचा उल्लेख करावा लागतो.

स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रियांच्या आकांक्षा वाढल्या आहेत.त्यांची अस्मिता जागृत झाली आहे. त्यांना त्यांचे अधिकार आणि हक्काची जाणीव झाली आहे.  समाजातील पुरूषांना जे जे अधिकार व हक्क आहेत ते ते सर्व स्त्रियांना दिले जावेत म्हणजेच सामाजातील स्त्री—पुरूष समानता होय अशी स्त्रीमुक्ती चळवळीची भूमिका आहे.  स्त्रीमुक्तीचा हा विचार करणा—या स्त्रियांना समतेच्या युगाचा नवा माणूस घडवावयाचा आहे. समान हक्क, समान संधी, समान दर्जा आणि समान स्वातंन्न्य हा स्त्रीमुक्ती चळवळीचा मुख्य गाभा आहे.

भारतीय स्वातंन्न्योत्तर कालखंडात लोकशाही आणि शिक्षणामुळे समाज घटकात अनेक सामाजिक जागृतीच्या चळवळी गतिमान झाल्या आहेत. त्यातच साहित्य लेखनाची चळवळ सक्रिय झाली. स्त्रियांनी आपल्या समग्र अनुभवाला शब्दरूप दिले आणि त्यातूनच स्त्रीवादी साहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला.

### स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य :

समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान समजून घेणे महत्वाचे आहे.  याच भूमिकेतून स्त्रीवादाचा प्रारंभ झाल्याचे दिसून येते.  स्त्रियांना आपल्या स्वत्वाची जाणीव होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे, माणुसपणाविषयी आत्मियता वाटणे तिला तिचे हक्क व अधिकार याची जाणीव करून देणे, त्याचबरोबर तिच्या शोषणाची आणि अवमूल्यनाची जाणीव करून देऊन तिला तिच्या स्वाविभानाविषयी संघर्षप्रवण करणे म्हणजेच स्त्रीवाद होय. गुलामीची जाणीव आणि त्याविरूध्द बंड म्हणजे स्त्रीवाद होय. माणूसपणाची जाणीव व्यक्त होऊन मानवी मूल्यांच्या प्राप्तीसाठी संघर्षशाली लढा देणे म्हणजे स्त्रीवादी साहित्याची पार्श्वभूमी आहे. स्त्रीवादाने स्त्रियांना नवीमूल्ये, नवे स्वप्न नव्या नव्या विचारांची, विशालतेची आणि वैश्विकतेची दृष्टी दिली आहे. स्त्रीसत्तेचा पुरस्कार म्हणजे स्त्रीवाद नव्हे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

स्त्रीवादी साहित्य हे भारतीय स्वातंन्न्योत्तर काळातील वाड्.मयीन चळवळ असली तरी इ. स. 1970 नंतर पाश्चात्य देशामध्ये स्त्रीवादी साहित्याचा विविधांगी अभ्यासाला प्रारंभ झाला आहे. गेल्या हजारो वर्षापासून स्त्री ही पुरूषप्रधान व्यवस्थेत जीवन जगत आहे.  स्त्रीची वाढ आणि तिचा विकासही पुरूषप्रधान व्यवस्थेत झाला असल्यामुळे तिला तिच्या स्त्रीत्वाचा विसर पडल्याची जाणीव स्त्रीवादी साहित्यातून जाणवते. स्त्रीवादी साहित्य हे स्त्री स्वातंन्न्याचा पुरस्कार करीत, पुरूषप्रधान व्यवस्था स्पष्टपणे नाकारते. समाज व्यवस्थेतील पुरूषी वर्चस्वाला हादरा देत स्वतःच्या स्वाभिमानाची जाणीव निर्माण करणे हे स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्टये आहे. स्त्रीवादी साहित्यातील फिमेल (स्त्री),

फमीनाईन (स्त्री प्राधान्य) आणि फेमिनिस्ट (स्त्रीवादी)या शब्दांचा आशय समजून घेणे आवश्यक आहे. पुरूषांनी स्त्री भूमिकेतून जे काल्पनिक लेखन केले आहे. त्या लेखनाला टाळून स्त्रीला स्वतःचे अनुभव लिहिल्याशिवाय ख–या अर्थाने स्त्री जीवनाची प्रतिमा समाजासमोर येणार नाही. अशी प्रमुख भूमिका स्त्रीवादाची आहे. अनुभव हा प्रत्यक्ष जगण्याचा अनुभव असतो. म्हणून पुरूषी कल्पनेचा अनुभव स्त्रीवादाने स्पष्टपणे नाकारला आहे. म्हणूनच स्त्रियांच्या अनेक पराधीन अवस्थांचे वास्तव चित्रण स्त्रीवादी साहित्यातून प्रकट झाले आहे. प्रारंभी स्त्रियांचे लेखन हे समाजसुधारणांच्या चळवळीने प्रभावित झाले होते. त्यानंतर बदललेल्या युगानुसार स्त्रियांच्या लेखनातून स्त्री स्वातंन्र्यांचे बीजारोपण झाल. या परिवर्तनाचे प्रतिबिंब स्त्रियांच्या लेखनात स्पष्टपणे अधोरेखित झाले.

### *काव्यलेखन :*

शब्द हे केवळ अक्षररचना नसते, तर ती अनुभवांची एक संरचना असते आणि तसेच ते त्या कलावंतांच्या जीवनाच्या अनुभवांचे दर्पण असते. इ. स. 1920 ते 1950 या काळातील स्त्रियांच्या धार्मिक कौटुंबिक व इतर भावना गीतांच्या माध्यमातून स्पष्ट झालेल्या आहेत. कोणत्याही कलाकृतीची उंची ही त्या लेखकाच्या प्रामाणिक अभिव्यक्तीवरच अवलंबून असते. स्त्रिच्या जीवनात पिता, भाऊ, पुत्र, पती यासारख्या अनेक प्रकारची नाती आहेत. या नात्यांचे प्रतिबिंबही स्त्रियांच्या काव्यलेखनातून स्पष्ट झाले आहे. या विविध नात्याबरोबरच निसर्गाचे विविध आविष्कार, सुख–दुःख अशा अनेक संवेदनक्षम समग्र अनुभवातून स्त्रियांच्या कविता व्यक्त झाल्या आहेत.

इ.स. 1950 पर्यंतच्या कालखंडातील प्रमुख कवयित्री म्हणून संजीवनी मराठे यांचा नावाचा उल्लेख करावा लागतो. त्यानंतर इ. स. 1947 मध्ये शांता शेळके यांचा वर्षा, 1951 मध्ये लक्ष्मीबाई टिळक व बहिणाबाई चौधरी यांनी काव्यसंग्रह संपादित केला. त्याचवर्षी इंदिरा संतांचा शेला हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतरच्या काळात पद्मा गोळे, अनुराधा पोतदार, वृंदा लिमये, शिरीष पै, रजनी परूळेकर, अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर, आसावसी काकडे, रजनी परूळेकर, मलिका अमरशेख, प्रज्ञा लोखंडे, ज्योती लांजेवार, यासारख्या अनेक कवयित्रींनी आपल्या अनेक अंगांनी काव्यलेखन करून स्त्रीवादी काव्यलेखनाचा प्रवाह गतिमान केला.

### *कथालेखन :*

स्त्रियांनी कथालेखनाच्या माध्यमातून आपल्या अनुभवाला शब्दरूप दिले. इ. स. 1896 मध्ये मनोरंजन मासिकातून शांताबाईची पहिली कथा प्रकाशित झाल्याचे दिसून येते. विभावरी शिरूरकर यांनी स्त्रियांच्या व्यथा–वेदना कथांच्या माध्यमातून व्यक्त केल्या आहेत. कळयांचे निःश्वास हा त्यांचा कथासंग्रह इ. स. 1933 मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर गौरी देशपांडे यांची कथा व्यक्त झाली. इ. स. 1945 ते 1960 या कालखंडात कुसुमावती देशपांडे, वसुंधरा पटवर्धन आणि शिरीष पै या प्रमुख कथालेखिका असून 1960 नंतर शांता किर्लोस्कर (डाक्याची साडी 1961), कमल देसाई (रिंग 1962), विजया राजाध्यक्ष (अधांतर 1965), सरिता पत्की (बारा रामाचं देऊळ–1966), लीला श्रीवास्तव, विजया राजाध्यक्ष, छाया दातार, दीपा गोवारीकर, निलिमा भावे, आशा बगे, प्रतिमा इंगोले, उर्मिला पवार, उषा दातार, यासारख्या अनेक लेखिकांचे कथासंग्रह प्रकाशित झाले. या त्यांच्या कथावाड्.मयात बालविवाह, विधवाविवाह, जुलमी पती, पतीचे विवाहबाह्य संबंध, कुमारी माता, मुलांचे संगोपन, गर्भधारणा, बाळंतपण आणि दलितांच्या व्यथा–वेदना चित्रित करण्यांत आल्या आहेत.

### *कादंबरी लेखन :*

स्त्रियांचें कादंबरी लेखन हे स्त्री सुधारणेकडून स्त्री स्वातंन्र्यांकडे वाटचाल करतांना दिसून येते. स्त्रियांवर होणा–या अन्याय अत्याचाराविरूध्द स्त्रियांनी कादंबरी लेखन करताना दिसून येतात. स्त्री ही एक जिवंत माणूस आहे. तिला स्वाभिमान आणि आत्मसन्मान आहे, तिलाही प्रेमाची, न्यायाची, समानतेच्या संधीची आणि मूल्यांची गरज आहे, या भूमिकेतून स्त्रियांचे कादंबरी लेखन प्रखरपणे दिसून येते.

इ.स. 1873 मध्ये लिहिलेले साळुबाई यांची चंद्रप्रभा विरहवर्णना ही कादंबरी दिसून येते. इ. स. 1873 ते 1950 पर्यंतच्या कालखंडातील स्त्रियांचे कादंबरी लेखन हे सुधारणात्मक आणि प्रबोधनात्मक स्वरूपाचे असून गीता साने व विभावरी शिरूरकर या कालखंडातील प्रमुख लेखिका आहेत.यानंतर काशीबाई कानेटकर (रंगराव), जानकीबाई देसाई (गृहलक्ष्मी 1915), यशोदाबाई भट (मुलांचे बंड 1921), शांताबाई नाशिककर (हाच का धर्म 1930), कमलाबाई बंबेवाले (बंधमुक्ता–1930), विभावरी शिरूरकर (हिंदोळयावर 1934), प्रेमा कंटक (अग्नियान 1942), शकुंतला परांजपे (घराचा मालक 1948), कमल देसाई (रात्रंदिन आम्हा 1964), यासारख्या अनेक लेखिकांचे कादंबरीलेखन प्रकाशित झाले आहे. स्वातंन्र्योत्तर काळातील लेखिका म्हणून कुसुम अभ्यंकर, सुमती क्षेत्रमाडे, शैलजा राजे, योगिनी जोगळेकर, मृणालिनी जोशी, निर्मला देशपांडे आदींचा उल्लेख करावा लागतो. या स्त्रियांच्या कादंबरी लेखनातून उद्याच्या स्त्रीला मान, सन्मान सामर्थ्य आणि आणि दिग्दर्शन करणारी प्रेरणा आहे.

### *आत्मचरित्र लेखन :*

स्त्रीलिखित आत्मचरित्रांचा आढावा घेताना प्रारंभीच्या काळातील आत्मचरित्रांमध्ये आपआपल्या पतीचे चरित्र अधिक आणि स्वतःचे अल्पचरित्र असे त्यांच्या आत्मचरित्राांचे स्वरूप आहे. स्त्रियांनी आपल्या पतीविषयीची भक्ती, निष्ठा, प्रेम, इच्छा, सहवास आणि आपला पती हाच परमेश्वर या भावनेतून स्त्रियांची आत्मचरित्र वाचकांसमोर आली आहेत. समाजातील आपल्या पतीविषयीचे गैरसमज दूर व्हावेत, आपल्या पतीचा मोठेपणा, मान–सन्मान आणि प्रामुख्याने आपल्या सहजीवनातील कृतार्थता व्यक्त करण्यासाठी स्त्रियांनी आत्मचरित्रांचे लेखन केले आहेत.

इ. स. 1910 मध्ये रमाबाई रानडे यांचे आमच्या आयुष्यातील काही आठवणी हे पहिले आत्मचरित्र असले तरी यात स्त्रीत्वाच्या व्यथा आणि वेदना दिसून येत नाही, तर इ. स. 1928 मध्ये प्रकाशित झालेले पार्वतीबाई आठवले यांचे माझी कहाणी या आत्मचरित्रात स्वतःविषयी लिहिलेले असल्यामुळे हेच स्त्रियांचे पहिले आत्मचरित्र म्हणता येईल. त्यानंतर लक्ष्मीबाई टिळक (स्मृती चित्रे 1934), शांता आपटे (जाऊ मी सिनेमात 1940), आनंदीबाई कर्वे (माझे पुराण 1944), लीला पटवर्धन (आमची अकरा वर्षे 1945), इंदिरा भागवत (या सदाशिव 1947), रोहीणी भाटे (माझी नृत्यसाधना 1950), यशोदा जोशी (आमचा जीवनप्रवास 1965), गोदावरी परूळेकर (जेंव्हा माणूस जागा होतो 1970), सुमती शहा (हे गीत जीवनाचे 1971), हंसा वाडकर (सांगते ऐका 1972), कुमुद पावडे (अंतःस्फोट 1981), मलिका अमर शेख (मला उद्ध्वस्त व्हावचंय 1984), शांताबाई कांबळे (माज्या मल्माची चित्तरकथा 1986), नजुबाई गावित (आदोर 1995) यासारख्या अनेक स्त्रियांनी आपल्या आत्मचरित्राातून स्त्री जीवनाची व्यथा, वेदना, दैन्य, संघर्ष, अपमान आणि वासना यावर प्रखरपणे प्रकाश टाकला आहे.अलिकडच्या काळात स्त्रियांच्या आत्मचरित्राातून वास्तव आणि वैचारिक स्त्री जीवनाच्या संघर्शाचे धगधगते चित्रण अधोरेखित होताना दिसून येत आहे.

### *निष्कर्ष :*

जगातील प्रत्येक स्त्रीची एक विशिष्ट स्वरूपाची संस्कृती असते. स्त्री संस्कृती ही वेगवेगळया रूपांमध्ये प्रकट होत असते. म्हणूनच स्त्रियांच्या साहित्याचा जीवशास्त्रीय, भाषिक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक अशा वेगवेगळया दृष्टिकोनातून तयांच्या साहित्याची समीक्षा करता येते. ज्यामध्ये इंग्रजी स्त्रीवादी समीक्षेने स्त्रियांच्या शोषणांवर भर देत मार्क्सवादी दृष्टीकोन स्वीकारला, अमेरिकन स्त्रीवादी समीक्षेने पाठचिकित्सक पध्दतीवर भर देत स्त्रियांच्या वाड्.मयीन आविष्काराचा शोध घेतला. फ्रेंच स्त्रीवादी समीक्षेने मानसशास्त्रीय भूमिकेतून त्यांच्या मानसिक कोंडमारीचेविश्लेषण केले. स्त्री भिन्नत्वाचा आणि वेगळेपणाचा शोध स्त्रीवाद समीक्षेतून अभ्यासता येते. इ. स. 1960 नंतरच्या या समीक्षेचे स्वरूप बहुतत्ववादी बनले आहे. स्त्रीवादी साहित्य आणि स्त्रीवादी समीक्षा या संकल्पना स्त्रीमुक्ती चळवळीतून उदयाला आल्या आहेत. स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण, त्यांचे अनुभव, स्त्रीत्वाची जाणीव, त्यांचे अनुभव, स्त्रीत्वाची जाणीव्यांचे आत्मप्रकटीकरण आणि आत्मशोध या स्त्रीवादी साहित्याच्या विभिन्न दिशा आहेत.

भारतातील जातीव्यवस्था जितकी कठोर आहे तितकीच स्त्री दाहकता कठोर आहे.
भारतातील इंग्रजी राजवटीमुळे आधुनिक जाणीव, शिक्षण आणि नवनवीन विचारांमुळे स्त्री लेखनाला चालना मिळाली.
समान हक्क, समान संधी, समान दर्जा आणि समान स्वातंन्र्य हा स्त्री मुक्तीचा मुख्य गाभा आहे. यातूनच निर्माण झालेल्या स्त्रीत्वाची जाणीव म्हणजेच स्त्रीवाद होय.
इ.स. 1920 ते 1950 या स्त्रीवादी साहित्यातील प्रारंभीच्या कालखंडातील त्यांच्या काव्यलेखनातून धार्मिक व कौटुंबिक भावना व्यक्त झाल्या आहेत.
इ. स. 1896 मध्ये शांताबाईची पहिली कथा मनोरंजन मासिकातून प्रकाशित झाली आहे.
प्रारंभीच्या काळातील स्त्रियांचे कादंबरी लेखन हे सुधारणेकडून स्वातंन्र्याकडे वाटचाल करताना दिसून येते, तसेच त्यांच्या आत्मचरित्रातून पतीच्या चरित्राचे गोडवे गाण्यात आले आहे.
स्त्रियांच्या प्रेम भावनांच्या अतिरेकी कल्पनांनी व्यक्तित्वाविशयीच्या स्त्रीत्वाच्या जाणीवा बोथट झाल्या असून सुख शोधण्याची स्त्रीवादात तडजोडीची वृत्ती आहे.

स्त्रीवादी साहित्यात मानवतेच्या स्त्री–पुरूषांच्या समान मूल्याचे तत्व आहे.

***संदर्भग्रंथ :***

1.साने गीता,  भारतीय स्त्रीजीवन
2.देवधर विद्या, स्त्रीलिखित कादंब–याः प्रेरणा आणि प्रवृत्ती
3.भालेराव विमल, आधुनिक मराठी वाड्.मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे
4.धोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षाः स्वरूप आणि उपयोजन
5.डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, प्रा. भगत दत्ता, डॉ. लिंबाळे शरणकुमारय ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य
6.डॉ. वाघमारे जनार्दन, साहित्य चिंतन
7.केळकर अशोक, मराठीचा आर्थिक संसार

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net